
ISSN-2277-4491

# VIBGYOR

Bi-annual Multi Disciplinary Research Journal
Special Issue : April 2018





# VIBGYOR

Bi-annual Multidisciplinary Research Journal
**SPECIAL ISSUE - APRIL 2018**

*The VIBGYOR, a plethora of gem studded writings by eminent scholars from across the globe would genuinely usher a new vigour among the intellectuals in the world. The National and International luminaries in the Editorial Board would synchronize the views penned by renowned scholars from far and wide for publication. The biannual Multi-disciplinary Research Journal extends its canvas to all qualitative writings.*

Editor In Chief
**DR. JOBI GEORGE**
Principal
Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Editor
**DR. SUNIL SHINDE**
Associate. Prof. & Head
Dept. of Economics
Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Published By
**Research Journal Publication Committee**
Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
Accredited with Grade B (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru
Dist. Nagpur - 441201(M.S.) India
Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
E-mail : vibgyorbmv@yahoo.in
Website : www.bgm.ac.in

**VIBGYOR**

Bi-annual Multidisciplinary Research Journal
Special Issue - April 2018

Published By
**Research Journal Publication Committee**
Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
Dist. Nagpur - 441201(M.S.) India
Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
E-mail : vibgyorbmv@yahoo.in
Website : www.bgm.ac.in

**UGC Approved List of Journals**
**Journal No. 46447**

**ISSN-2277-4491**

**Special Issue : April 2018**

**© Author**
Copyright © All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrival system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise without prior permission of the Editor.

The papers included in this publication have been directly reproduced, with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the research papers are those of contributors and do not necessarily match the views of Research Journal Committee of the college. The Publisher or Editorial Board is not responsible for any information contained therein.

**Type Setting**
**Scan Dot Computer,**
Mahal, Nagpur Mobile : 9822565782
E-Mail : aakar100@gmail.com

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | THE STATUS OF ENGLISH AS A LINK LANGUAGE IN INDIA TODAY: A REVIEW | **Dr. Jobi George** ..... 7 |
| 2. | Identity and Multiculturalism in Zadie Smith's, 'White Teeth' | **Dr. Vinita S Virgandham** ..... 12 |
| 3. | Identity, Displacement, and Resilience: Amitav Ghoshs Portrayal of the Colonial Experience | **Dr. Raheel Quraishi** ..... 18 |
| 4. | A study on Patent awareness among faculties of Engineering Colleges | **Rajasree O.P., Mangala A. Hirwade, Sunilkumar U.T.** ..... 22 |
| 5. | An Overview of Indian Government Policies in the Agricultural Sector and Farmers' Suicides | **Dr. Mangesh Kadu** ..... 29 |
| 6. | Physical Fitness: The need of the Era | **Asst. Prof. Aditya Sarwe** ..... 35 |
| ७. | द्रारिद्र्य निमुर्लन आणि सरकारच्या कल्याणकारी योजना : एक दृष्टीक्षेप | **प्रा. डॉ. सुनिल शिंदे** ..... ३७ |
| ८. | महाराष्ट्रातील तमाशा : एक लोकनाट्य | **प्रा. डॉ. मधुकर वि. नंदनवार** ..... ४१ |
| ९. | मानवाधिकार और बुद्ध तत्वज्ञान | **प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण** ..... ४६ |
| १०. | नागपुर शहरातील औद्योगिक विकासासाठी कामगारांचे अध्ययन : एक अभ्यास | **प्रा. डॉ. राजेश बहुरुपी** ..... ५० |
| ११. | आधुनिक काळात मूल्यशिक्षण व्यवसायाची खरी गरज | **प्रा. डॉ. अनिता महावादीवार** ..... ५३ |
| १२. | धम्मपालनाची मानवी दृष्टिकोनातून वर्तमान उपयोगिता | **सहा. प्रा. सोमेश्वर विनोदराव वासेकर, सहा. प्रा. भिमादेवी महादेव डांगे** ..... ५७ |

# आधुनिक काळात मूल्यशिक्षण व्यवसायाची खरी गरज

❑ प्रा. डॉ. अनिता महावादीवार
साहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग,
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

**सारांश :**

मनुष्य हा एक समाजशील प्राणी आहे. सर्वप्रथम तो कुटुंबात मोठा होतो. त्यानंतर त्याचा शाळेशी संबंध येतो. शेवटी तो समाजात वावरतो. मात्र जेव्हा त्याला आपण समाजाचा एक घटक आहो ही जाणीव होते तेव्हा ही जाणीव होत असतांना त्याला मूल्यशिक्षणाचे महत्व वाटायला लागते. शिक्षण प्रक्रियेत मूल्यशिक्षणाला अनन्यसाधारण असे महत्व आहे. शिक्षणाच्या माध्यमातून आवश्यक ती मूल्य जोपासली जावून ती विकसित करणे हाच मूल्यशिक्षणाचा मुख्य हेतू आहे. आजच्या आधुनिक काळात व्यवसायाची सामाजिक जबाबदारी ही संकल्पना एक नैतिक जबाबदारी म्हणून मूल्यशिक्षणावरच आधारित आहे. व्यवसाय समाजापासून वेगळा होवू शकत नाही. व्यवसाय आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणूनच व्यवसायाला आपले नाव समाजात मिळवायचे असेल तर त्यासाठी काही नैतिक मूल्य समाजाप्रती जोपासावी लागतात. त्यासाठी मूल्यशिक्षणाचीच गरज असते. कारण व्यवसायाच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटक महत्वाचा असतो. कारण या प्रत्येक घटकांचा संबंध व्यवसायाशी येतो. व्यवसायाबाहेर असे अनेक घटक असतात की, ज्यांचा भरवशावर व्यवसाय उभा असतो. म्हणूनच मूल्यशिक्षण आणि व्यवसाय यांचा फार जवळचा संबंध आहे. शिक्षण क्षेत्रातील मूल्यशिक्षणाचे हेच महत्व लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष १९९७-९८ पासून शासनाने शालेय स्तरावर इयत्ता पहिली ते दहावीसाठी मूल्यशिक्षण हा विषय अनिवार्य केलेला आहे.

**प्रास्ताविक :**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. माहिती तंत्रज्ञानाबरोबरच विकासाच्या संपूर्ण क्षेत्रात विज्ञानानेही बरीच प्रगती केलेली आहे. त्यामुळे जग आज भौतिक अंगांनी समृध्द व समर्थ झालेले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. जगाने भौतिक शास्त्रविकासात नेत्रदीपक मजल मारलेली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने तर फार मोठी कामगिरी करून दाखविली आहे. परंतु तरीही या दोहोच्या आधारे मानवी जीवन मात्र अधिकच असुरक्षित झालेले आहे. कारण कमावलेल्या शक्तिच्या सामर्थ्याबरोबरच त्याच्याशी सुसंगत अशी मानवता जपणारी मूल्य मात्र जोपासली गेलेली नाहीत.

भारत हा विकसनशील देश आहे. विकासाच्या प्रक्रियेत असणाऱ्या देशाने मानवी मूल्यांची जपणूक करून मानवी कल्याण केल्यास ते योग्य होवू शकेल. मानवी संकट टाळायचे असेल तर मानवाच्या कल्याणासाठी आजवर निर्माण व विकसित झालेल्या मानवी मूल्यांचा सर्व समाजांमध्ये आणि व्यक्ति-व्यक्तीमध्ये परिपोष होण्याची आज गरज आहे. या मूल्याची रूजवणूक करणे, जपणूक करणे क्रमप्राप्त असल्याने मानवी जीवनमूल्यांचा परिपोष शिक्षणातून अधिक परिणामकारकतेने होवू शकतो. असा सर्वसामान्यांचा विश्वास आहे. म्हणजेच भारतासारख्या देशात अनेक सामाजिक समस्यांची सोडवणूक होवून मानवतेच्या विकासाचा, प्रगतीचा मार्ग मोकळा व्हावा यासाठी भारतासारख्या विकसनशील देशांना अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मूल्यांचे शिक्षण साधता येईल अशी भूमिका स्वीकारावी लागेल.

**मूल्यशिक्षणाचा अर्थ :**

१. 'ज्या मानवी मूल्यांच्या संस्कारातून व्यक्ती, समाज, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय सामंजस्य यांचा ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक पातळीवर विकास होतो त्या शिक्षणाला मूल्य शिक्षण म्हणतात.' - डॉ. गावंडे

२. एखाद्याच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला तसेच समाजहिताला समायोजनास उपयुक्त ठरणारी आणि संस्कृतीला अनुसरून असणारी मार्गदर्शक जीवन तत्वे म्हणजे मूल्य होय.

३. इतरांशी योग्यरितीने वर्तन करण्यास जे मदत करते त्यास नैतिक मूल्ये असे म्हणतात.

शिक्षण हे एक समाजाच्या परिवर्तनाचे साधन आहे. समाजात विविध स्तरांवर विविध घटक असतात. या प्रत्येक घटकांचा विकास जोपर्यंत होणार नाही तोपर्यत समाजपरिवर्तन शक्य नाही. कारण समाजातील प्रत्येक घटकांच्या संवर्धनासाठी आणि व्यक्ति विकासासाठी आवश्यक ती मूल्ये विकसित करण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे. म्हणून मूल्यशिक्षणाचा विचार करतांना विद्यार्थी जीवनापासूनच जर

आपण हे शिक्षण दिले तर विद्यार्थ्यांच्या विकासाबरोबरच मूल्यांचे संवर्धन होवून समाजात मूल्यांची लवकरात लवकर जपणूक होणे शक्य होईल. पुढे हाच विद्यार्थी समाजाचा घटक तसेच एक आदर्श नागरिक बनून तो व्यवसायाच्या विकासातही हातभार लावेल.

परिणामी व्यवसायाची भरभराट होईल. याउलट जर मानवतेच्या मूल्यांची योग्य जोपासना न होता, चारित्र्याची घडण न होताच सुशिक्षित झाल्यामुळे मानवानेच निर्माण केलेल्या वेगवेगळ्या शक्ती मानवाविरूध्द वापरल्या जावून त्या व्यक्तिचा व मानवतेचा नाश करतांना दिसतात. म्हणून मूल्यशिक्षणाद्वारा माणसाला माणूस बनविणारे, शिक्षण मिळायला पाहिजे. तरच समाज घडू शकेल.

**मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका :**

समाजाला घडवितांना मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका ही फार महत्वाची ठरते. कारण सागरातील दिपस्तंभ ज्याप्रमाणे जहाजांना वाट दाखविण्याचे कार्य करतो त्याचप्रमाणे शिक्षक हा समाजाचा दिपस्तंभ आहे. असेल त्या परिस्थितीत शिक्षकाला नेतृत्व करतांना विविध भूमिका वठवाव्या लागतात. बरेचदा तो माळयाचेही काम करतो. केव्हातरी प्रकाशदूत म्हणूनही त्याला सारथ्याची भूमिकाही पार पाडावी लागते.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगत कामगिरीमुळे मानवी जीवनाची विलक्षण प्रगती होत आहे. या प्रगतीच्या वाटेवर माणसाचे जीवन सुखी होईल असे वाटले. परंतु मानवाचे भौतिक सुख वाढूनही त्याच्या आत्मिक सुखात अजूनही भर पडलेली दिसून येत नाही. कारण भौतिक सुखाबरोबरच नैतिक मूल्यांचा विकास व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्रीय जीवनात व्हायला पाहिजे होता परंतु त्या प्रमाणात तो झालेला नाही. त्यामुळे मानवाला भौतिक सुखाची साधने मिळूनही तो समाधानी नाही. आणखी तो सुखाच्याच शोधात भरकटलेला दिसून येतो. म्हणून व्यक्ती, समाज व देशात विकासाबरोबरच मूल्यशिक्षण रूजल्यास देश भौतिक प्रगतीच्या मागे न धावता आत्मिक समाधान मिळविण्याचा प्रयत्न करेल. यासाठी बऱ्याच विकसनशील देशांनी मूल्यशिक्षणाबाबत पुढाकाराची भूमिका घेतलेली आहे. एवढेच नव्हे तर विविध देशांत विविध स्तरांवर याबत प्रयोग होत आहेत. या सर्व प्रयोगात देशातील परिस्थितीनुसार जरी विविधता असली तरी मूल्यशिक्षण देण्याच्या बाबतीत मात्र एकमत असलेले दिसून येते. यासाठी शासनाने मूल्यशिक्षण देतांना दहा मूल्यांचा विचार केलेला आहे.

**१. सौजन्यशीलता :**

आपले आचार-विचार तसेच आपल्या बोलण्यातून इतरांविषयीचा आदरभाव व्यक्त करणे व कुणालाही न दुखावता व्यवहार करणे म्हणजे सौजन्यशीलता होय. आजच्या या स्पर्धेच्या युगात प्रत्येक व्यक्ती स्वार्थी होत चाललेला दिसून येतो. तो फक्त स्वतःचाच विचार करतांना आपण बघतो. इतरांबद्दलची आस्था, आपुलकी त्याच्यात दिसून येत नाही. मला काय करायचे आहे? मी कशाला करू? असे प्रश्न त्याच्या मनात वारंवार निर्माण होत असतांना आपल्याला दिसून येतात. परंतु ही वागणूक कुटुंबात आढळून आल्यास व त्यामुळे कुटुंबातील व्यक्ती दुखावल्या गेल्यास फारसे नुकसान होणार नाही. कारण कुटुंबात आपण एकमेकांना गुणदोषांसह स्वीकारलेले असते. परंतु सार्वजनिक ठिकाणी मात्र यामुळे बरेचसे गैरसमज पसरू शकतात. त्यामुळे शत्रुत्वही निर्माण होवू शकते. अशावेळी एक दुसऱ्यांच्या मनाला जोडण्याचे काम सौजन्यशीलतेतच आहे.

**२. सर्वधर्मसहिष्णुता :**

प्रत्येक धर्मातील लोकांना आपआपल्या धर्माविषयी तसेच आपआपल्या धर्मातील लोकांविषयीची आत्मीयता वाटत असते. तीच आत्मीयता इतर धर्मातील लोकांविषयी वाटणे यालाच सर्वधर्मसहिष्णुता असे म्हणतात. प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माप्रमाणे आचार विचाराचे स्वातंत्र्य आहे. व्यक्तीचा धर्म म्हणजे त्या व्यक्तीची जीवनशैली होय. व्यक्तीच्या जीवनशैलीवरूनच आपण त्याचा धर्म ओळखु शकतो. इतका प्रभाव धर्माचा व्यक्तीच्या जीवन जगण्याच्या पध्दतीवर पडलेला आहे. समाजात वावरतांना विविध धर्मातील व्यक्तींशी आपला संबंध येतो. अशावेळी एकमेकांना समजवून घेतांना तसेच सामुहीक कार्यातून आपल्याला आपली प्रगती साधतांना आपल्याकडून कोणी दुखावला जाणार नाही यासाठी आपल्यामध्ये सहिष्णुवृत्ती असणे आवश्यक आहे. एकतेचे सामर्थ्य जर आपल्याला अनुभवायचे असेल तर सर्वधर्मसहिष्णुता हे मूल्य लहानपणापासून रूजवण्याची गरज आहे. तेव्हाच आपण समाजातील विविध घटकांशी साधर्म्य साधु शकू.

**३. वैज्ञानिक दृष्टिकोन :**

सृष्टीचे नियम हे आपल्या मनाला वाटेल असे बदलणारे नसतात. ते शास्त्रीय सत्यावर आधारलेले असतात. त्यानुसार आपल्या वागण्यात बदल करणे यालाच वैज्ञानिक दष्टिकोन असे म्हणतात. शास्त्रीय सत्याच्या शोधामुळे समाजातील वाईट चालीरीती, रूढी, परंपरा अंधश्रध्दा, गैरसमजुती यांना धक्के

बसतात. म्हणून शास्त्रीय सत्य समजणे, पचविणे हे सामान्य माणसाला लवकर जमत नाही. तेव्हा असा जर वैज्ञानिक दृष्टिकोन आपण जर ठेवला तरच होणारे बदल स्वीकारणे व्यक्तीला शक्य होईल.

**४. श्रमप्रतिष्ठा :**

एखाद्यांविषयीचा आदर बाळगून त्यांच्या कामात सहभागी होणे म्हणजे श्रमप्रतिष्ठा होय. आजच्या या विज्ञान युगात सगळीकडे संगणकाचे जाळे पसरलेले आपल्याला दिसून येते. विविध आधुनिक साधन-सुविधांमुळे अनेक गोष्टी कमी श्रमात, अल्प वेळात उपलब्ध होत आहेत. त्यामुळे साहजिकच शारीरिक श्रम टाळण्याकडे व्यक्तीचा कल होत चाललेला आहे. परंतु श्रमाशिवाय कुठलाही पर्याय नाही. ही बाब कुणीच आजपर्यंत लक्षात घेतली नाही. कारण श्रमाशिवाय विकास होणे शक्य नाही. लहान वयात मुलांच्या कृतीशीलतेला वाव देवून लहान-मोठी श्रमांची कामे करण्यात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग घेतला तर हे मूल्य त्यांच्यात अंगी बाणू शकेल. त्यामुळे मुलांना कुटुंबात, शाळेत, परिसरात वावरतांना टाळाटाळ न करता अशी कामे करण्यास स्वेच्छेने पुढे येणे आवडेल. श्रमाच्या कार्यात त्यांनी पुढाकार घेतल्याने श्रमनिर्मितीचा त्यांना आनंद मिळेल. कळत नकळत त्यांच्या मनात श्रमाबद्दल आवड निर्माण होईल.

**५. नीटनेटकेपणा :**

नीटनेटकेपणा या शब्दाचा अर्थ समजवून घेण्यासाठी सवयीच्या माध्यमातून नीटनेटकेपणाच्या अनुभवाचा आनंद विद्यार्थ्यांना देणे होय. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवन जगत असतांना विविध वातावरणात, विविध प्रसंगी नीटनेटकेपणाचा अनुभव देत नीटनेटकेपणाची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. कारण विद्यार्थी आपल्या शालेय जीवनाच्या प्रवासात सार्वजनिक ठिकाणापासून तर व्यक्तीगत जीवनाच्या विविध प्रवाहात तो काम करीत असतो त्यामुळे कुठेही वावरतांना त्यांने नीटनेटकेपणाच्या भूमिकेतून वावरले पाहिजे.

**६. स्त्री-पुरूष समानता :**

प्रत्येक व्यक्तीला घटनेने दिलेले मुलभूत हक्क व अधिकार मिळाले पाहिजे. मग ती व्यक्ती पुरूष असो वा स्त्री. प्रत्येक स्त्री व पुरूषास कुटुंबात, समाजात त्यांना माणूस म्हणून सारखीच वागणूक मिळाली पाहिजे. त्यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद होता कामा नये. जीवन जगत असतांना समान संधी, समान हक्क आणि समान अधिकार प्रत्येक व्यक्तीला मिळाला पाहिजे.

**७. वक्तशीरपणा :**

दैनंदिन जीवनातील प्रत्येक काम, प्रत्येक उपक्रम वेळेवर करणे म्हणजे वक्तशीरपणा होय. वेळेचे महत्व जाणणे, कोणतेही काम त्यानुसार वेळेवरच करणे, वेळे सांभाळण्यासाठी आटोकाट प्रयत्न करून परिस्थितीवर मात करणे आणि वेळेच्या काटेकोर उपयोगाने स्वतःच्या, इतरांच्या व कुटुंबाच्या जीवनात सुसंवाद साधणे म्हणजे वक्तशीरपणा होय. दैनंदिन जीवनातील कामे, इतरांनी नेमून दिलेली कामे नियोजित वेळेत करणे हे यात अपेक्षित असते.

**८. राष्ट्रीय भक्ती :**

आपला देश, समाज, संस्कृती, चालीरीती, परंपरा, इतिहास, भाषा, राष्ट्रीय प्रतिके, सण, उत्सव, देशबांधव, निसर्ग, याविषयी सार्थ अभिमान व उत्कट प्रेम बाळगणे व त्यासाठी जीवनात आवश्यक तो त्याग करण्याची भावना जागृत ठेवणे. तसेच आपले संपूर्ण जीवन देशासाठीच आहे अशी भावना ठेवून आपण आपले आचरण ठेवणे म्हणजे राष्ट्रभक्ती होय. राष्ट्रभक्ती फक्त देशावर संकट आल्यासच दिसली पाहिजे असे नाही तर दैनंदिन जीवनात, प्रत्येक वेळी आचरण्याची ही बाब आहे. भारतासारख्या देशाला तर ही राष्ट्रीय एकात्मता अतिशय गरजेचे आहे. तरच आपला देश विकास साधु शकेल.

**९. राष्ट्रीय एकात्मता :**

आपण सारे भारतीय आहोत, अशी भावना जागृत ठेवणे यालाच राष्ट्रीय एकात्मता असे म्हण्टले आहे. भारतात अनेक जाती, धर्म व पंथाचे लोक राहतात. तरीही आपल्या देशात राहणारे आपण सर्व एकच आहोत ही भावना त्यांच्यात जेव्हा येते. त्यालाच राष्ट्रीय एकात्मता असे आपण म्हणतो.

**मूल्यशिक्षण व व्यवसाय :**

मूल्यशिक्षणाचा संबंध व्यवसायाशी येतो हे जरी आपण मान्य केले असले तरी जोपर्यंत एखादा व्यक्ती मूल्यशिक्षणाचे हे धडे घेणार नाही. तोपर्यंत त्याचा सर्वांगीण विकास होवू शकणार नाही. जेव्हा त्याचा सर्वांगीण विकास होईल तेव्हाच तो व्यवसायातील अनेक जबाबदारी पाड पाडण्यास समर्थ ठरू शकेल. कारण व्यवसायाचा संबंध समाजातील अनेक जातीच्या, धर्माच्या तसेच स्वभावाच्या लोकांशी येतो. तेव्हा वरील संपूर्ण गुण जोपर्यंत व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींमध्ये असणार नाही तोपर्यंत तो व्यवसायात यशस्वी होवू शकणार नाही. म्हणजे व्यवसायासाठी मूल्यशिक्षणाची फार गरज आहे. आधुनिक काळात व्यवसायात फार मोठ्याप्रमाणात स्पर्धा

वाढलेली आहे. व्यवसायातील जोखीमींचेही प्रमाण वाढलेले आहे. तेव्हा या जोखिमींना सामना करण्याची हिंमत ही मूल्यशिक्षणामुळे येतांना आपल्याला दिसून येते. म्हणूनच मूल्यशिक्षणाचे महत्व व्यवसायात नाकारता येणार नाही.

**सारांश :**

शालेय शिक्षणापासूनच जर आपण विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणाचे धडे रूजविले तर पुढची भावी पिढी व समाजातील प्रत्येक घटक मूल्यशिक्षणाचा लाभ घेवू शकेल. कारण मूल्यशिक्षणातून समाजात जीवन जगण्यासाठी ज्या गोष्टींची गरज असते त्या संपूर्ण बाबी आपल्याला मूल्यशिक्षणातून मिळते. तसेच व्यवसाय हा सूध्दा समाजाचा एक भाग आहे. व्यवसायाचीही काही नैतिक व सामाजिक जबाबदारी असते. ही सामाजिक व नैतिक जबाबदारी स्वीकारून समाजातील ग्राहक वर्गांना समाधानी ठेवण्यासाठी मूल्यशिक्षणाची फार मदत होईल. म्हणूनच यशस्वी व्यावसायिकाला मूल्यशिक्षणाची नितांत गरज असते.

**संदर्भसूची :**

१. Thakur, K. S., Business Ethics and Environment, (2011), Aadi Publications, Jaipur
२. नागतोडे किरण, (२००६), नैतिकमूल्य शिक्षण, विद्याप्रकाशन, नागपूर.
३. मुळावकर, संतोष मुळावकर कल्पना, (२००५), मूल्यशिक्षण सुसंवाद, विद्याप्रकाशन नागपूर.
४. गावंडे, एकनाथ, गावंडे, अमित, ( २००८), मूल्याधिष्ठित शिक्षण, नित्य नूतन प्रकाशन, पूणे.
५. मुंढे, डॉ. बाबु जनार्दन, मूल्यशिक्षणः काळाची गरज, भाषा आणि जीवन

☆☆☆